**रेग्यु. क्रि. केस नं. ६२/२०२२**

**निशाणी – १७**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक – ०१ मी शपथपूर्वक सांगतो कि –</u>**

**माझे नाव –** सुरेश जगन्नाथ सकट

**वय** – ४६, **व्यवसाय**– शेती

**राहणार**– नेवरी, ता. कडेगांव जि. सांगली.

**<u>सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकिल श्री.वाय.जी.चन्ने तर्फे साक्षीदारचा सरतपास शपथेवर –</u>**

१. दिनांक ०४/०४/२०२२ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरिता नेवरी येथे पूजा उदयोग समूह येथे बोलाविले. घटनास्थळ पोलीस पवार यांनी दाखविले मला दुस–या पंचाचे नाव सांगता येणार नाही. घटनास्थळी वासंती रवींद्र ठोंबरे होते. घटनास्थळी नेवरी ते विटा जाणारा रस्ता आहे. घटनास्थळी कृषीसाहित्य होते.त्यामध्ये पाईपा, सॉकेट, जॉयडर असे साहित्य होते. तेथे कापड दुकान होते. पंचनामा ९.१५ ते ९.५५ चालू होता. मला आता पंचनामा दाखविला त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. पंचनाम्यास निशाणी १८ दिली. .

सरतपास पुर्ण

**<u>आरोपीतर्फे वकिल श्रीमती डी.डी.जगताप यांचेतर्फे उलटतपास शपथेवर</u>**

मी शेती करतो हे खरे नाही की, मी फिर्यादीच्या घराजवळ राहतो. हे खरे आहे की, मला पोलीसांनी पंचनाम्याकरिता बोलावल्यावर मी गेलो. हे खरे नाही की, मी को–या कागदावर सही केली. हे खरे नाही की, पंचनामा पोलीसांनी तयार केला व मी

त्यावर सही केली. हे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. हे खरे नाही की, फिर्यादी माझे ओळखीचे असल्यामुळे खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण

श्रवणोत्तर स्वीकृत,

दि. २०/०७/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव.

वरील जबाब साक्षीदारास वाचुन दाखविला असता तो मान्य असल्याचे कबुल करतो.

दि. २०/०७/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव.

**रेग्यु. क्रि. केस नं. ७८/२०१८**

**निशाणी – ६५**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक – ०४ मी शपथपूर्वक सांगतो कि –**

**माझे नाव –** किशोरकुमार शंतनु पाटील

**वय** – ४८, **व्यवसाय**–शेती

**राहणार**– रामापूर , ता. कडेगांव जि. सांगली.

**सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकिल श्री.वाय.जी.चन्ने तर्फे साक्षीदारचा सरतपास शपथेवर –**

१. फिर्यादी चुलत भाउ आहे. मी आरोपींना ओळखतो ते आज कोर्टात हजर आहेत. आरोपी आमच्या शेजारी राहतात. आमच्यात संडास बाथरुमच्या बांधकामावरुन वाद आहे.

२. दिनांक ०८/०४/२०१८ रोजी पहाटे ३ वाजता आम्ही घरी मी, माझी पत्नी, आई व मुले झोपलो असताना आरडाओरडा ऐकू आला. आम्ही घराचे दार उघडून बाहेर आलो. आरोपी फिर्यादीला व त्याच्या पत्नीला काठयांनी मारहाण करत होते. ते फिर्यादीच्या घरात होते. आरोपी असे म्हणत होते की, आमच्या जागेत संडास बाथरुम का बांधले . ते बांधकाम गट नं २७० मध्ये चालले होते. आरोपींनी संडास बाथरुमची भिंत पाडली व निघून गेले. ज्या काठयांनी मारहाण झाली त्या दाखविल्यास मी ओळखू शकतो. साक्षीदारास वस्तू अ वरील काठया दाखवल्या. याच काठयांनी मारहाण झाली होती.

सरतपास पुर्ण

**<u>आरोपींतर्फे आरोपी क्र. १ ने त्याला उलटतपास घ्यायचा आहे असे सांगितल्याने</u>**

**<u>उलटतपास शपथेवर सुरु</u>**

हे खरे की, फिर्यादी माझा सख्खा चुलत भाउ आहे. हे खरे नाही की, जेव्हा बांधकाम चालले तेव्हा तिथल्या वाळूचा पंचनामा झाला होता. हे खरे नाही की, आरोपी व माझ्यात वारंवार वाद असतात. हे खरे की, संडास पाडले म्हणून कडेगाव कोर्टात दावा सुरु आहे. हे खरे नाही की, वस्तू अ सारख्या काठया बाजारात मिळतात. फिर्यादी व माझ्या घराच्या मध्ये २० फुटाचे अंतर आहे. मी माझ्या गटाची मोजणी केली आहे. माझ्या घराकडे जाण्यासाठी गट नं.२७० मधून वाट आहे. मी गट नं. २६८ मधून जात नाही. हे खरे नाही की, माझे व आरोपीचे सरबांधावरुन वाद आहेत. हे खरे की, माझ्या विरुध्द फौजदारी केस याच कोर्टात चालू आहे.

उलटतपास पूर्ण

श्रवणोत्तर स्वीकृत,

दि. २०/०७/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव.

वरील जबाब साक्षीदारास वाचुन दाखविला असता तो मान्य असल्याचे कबुल करतो.

दि. २०/०७/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव.